दैनिक
# मेट्रो सिटी वृत्तांत
वर्ष 3 रे
गुरुवार दिनांक 02/01/२०२५
METRO CITY VRUTANT
किंमत २ रु
» पिंपरी चिंचवड व पुणे » पान 8 » अंक 14 » RNI - MAHMAR/2021/51259 » metrocity924@gmail.com » www.metrocityvrutant.in

## विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी एकच नाव

CBSE Affiliation No.1131410

# अधिरा इंटरनॅशनल स्कूल





श्री.नवनाथ मारुती ढवळे
चेअरमन : अधिरा इंटरनॅशनल स्कूल















शिक्षण म्हटलं की विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षण मिळणे अत्यंत आवश्यक असते, त्यासाठी प्रत्येक पालक हा उत्तमोउत्तम शाळेच्या शोधात असतो, जेथे विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षणाबरोबरच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा हा एक महत्त्वाचा उद्देश पालकांचा असतो, या उत्तम शाळा आपल्या पिंपरी चिंचवड शहरात मोठ्या प्रमाणात आहेत. परंतु विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास उत्तम प्रकारे होण्यासाठी पुनवळे येथील अधिरा इंटरनॅशनल स्कूलचे नाव सर्वात प्रथम घ्यावे लागते. अधिरा इंटरनॅशनल स्कूल या इंग्रजी माध्यम शाळेची ची स्थापना नवधिरा एज्युकेशनल फाउंडेशन अंतर्गत 2020 साली श्री. नवनाथ मारुती ढवळे यांनी केली, सध्या आधिरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये सी.बी.एस.सी. अंतर्गत शिक्षण दिले जात असून नर्सरी ते 9 वी पर्यन्त ची शाळा आहे; भविष्यात 12 वी पर्यंत शाळा करण्याचा श्री नवनाथ ढवळे यांचा मानस आहे. सध्या शाळेत 900 विद्यार्थी शिक्षण घेत आहेत.अधिरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये शिक्षणा व्यतिरिक्त विद्यार्थ्यांच्या बौद्धिक व शारीरिक विकासासाठी शाळेच्या वतीने अनेक उपक्रम राबविण्यात येतात.आजचे युग हे स्पर्धेचे युग आहे. प्रत्येक ठिकाणी स्पर्धा वाढलेली आहे.या करिता अधिरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये विविध उपक्रम राबविले जातात.या मध्ये स्कूलच्या सर्व शिक्षकांचा मोठा सहभाग असतो, विद्यार्थ्यांना नवीन काही करण्याची प्रेरणा मिळावी. या साठी येथील सर्व जण प्रत्नशील असतात खरोखरच प्रत्येक विद्यार्थ्यांच्या आयुष्यात अधिरा इंटरनॅशनल स्कूल खूप मोठी भूमिका बजावत आहे

उत्तम शिक्षण देणारे अनुभवी शिक्षक, शाळेचे योग्य व्यवस्थापन करणारे शाळेचे पदाधिकारी हे या स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या शिक्षणाबरोबरच विद्यार्थ्यांना अनेक उपक्रमातून सर्वांगीण विकासाचे धडे देण्यासाठी नेहमी प्रयत्नशील असतात.ही या स्कूलची जमेची बाजू म्हणावी लागेल.

अधिरा इंटरनॅशनल स्कूलमध्ये विविध स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येते. यामध्ये इंग्लिश , मॅथ

सायन्स ,सायबर व जनरल नॉलेज यांचा समावेश असतो, तसेच स्कॉलरशिप परीक्षा, शालेय अंतर्गत प्राथमिक आणि मध्यवर्ती परीक्षा, तसेच डॉक्टर होमी भाभा व राष्ट्रभाषा हिंदी याचबरोबर शारीरिक शिक्षण यासंबंधी स्पर्धा परीक्षांचे आयोजन करण्यात येतात.

विद्यार्थ्यांना शिक्षणाबरोबरच खेळाची आवड निर्माण व्हावी त्यांचे शारीरिक आरोग्य चांगले व्हावे यासाठी विविध खेळांचे स्पर्धा आयोजित करण्यात येतात, यामध्ये जिल्हा परिषद वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या खेळांच्या स्पर्धांचा समावेश असतो तसेच इंटरनॅशनल स्कूल मार्फत कराटे ,स्केटिंग तसेच शारीरिक शिक्षणाचे प्रशिक्षण देणारे उपक्रम राबविण्यात येतात.

अधिरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये शिक्षणाच्या दृष्टिकोनातून अनेक सुविधा पुरविण्यात आले आहेत. यामध्ये प्रयोगशाळा, नृत्य कक्ष म्हणजेच डान्स क्लास, यामध्ये झुंबा डान्स साठी वेगळा वर्ग व संगीत शिक्षणासाठी वेगळा संगीत कक्ष विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून देण्यात आला आहे.

विद्यार्थ्यांना जलसंधारण म्हणजेच पाणी वाचवा व वीज संरक्षण म्हणजेच वीज वाचविण्याचे सर्व धडे या शाळेमध्ये देण्यात येतात तसेच प्रदूषणावर आपण कसे मात करु शकतो याचेही प्रशिक्षण, जनजागृती व प्रदूषण जागृती चे अनेक उपक्रम या स्कूलच्या माध्यमातून राबविण्यात येतात.

अधिरा इंटरनॅशनल स्कूल मध्ये विद्यार्थ्यांना मिळणारे सर्वांगीण शिक्षण विद्यार्थ्यांच्या पुढील आयुष्यात महत्त्वाची भूमिका बजावण्यासाठी अत्यंत आवश्यक असल्याचे या स्कूलचे संस्थापक नवनाथ ढवळे नेहमी सांगतात. आजचा विद्यार्थी हा उद्याचा आपल्या देशाचा आदर्श नागरिक कसा होईल या दृष्टिकोनातून अधिरा इंटरनॅशनल स्कूलचा शैक्षणिक प्रवास सुरु आहे, विद्यार्थ्यांना चांगले शिक्षण मिळावे विद्यार्थी हा भविष्यकाळात एक आदर्श नागरिक व्हावा या दृष्टिकोनातून अधिरा इंटरनॅशनल स्कूल ची शैक्षणिक वाटचाल यशस्वीरित्या सुरु आहे. या लेखाच्या माध्यमातून प्रत्येक पालकाने आपल्या मुलांच्या उज्वल भविष्यासाठी अधिरा इंटरनॅशनल स्कूल ची निवड करावी असे सांगावेसे वाटते.

## प्रगतीशील महाराष्ट्र,गतीशील महाराष्ट्राच्या निर्धारासाठी एकजूट करुया




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

मुंबई, :- नवा महाराष्ट्र घडवायचा आहे. प्रगतीशील महाराष्ट्राला आणखी गतीशील बनवायचे आहे. त्यासाठी आपण सर्वांनी ..महाराष्ट्र आता थांबणार नाही...अशी प्रतिज्ञा करूया, एकजूट करुया असा निर्धार व्यक्त करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील नागरिकांना नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

हा निर्धार पूर्ण करण्यासाठी राज्यातील कष्टकरी, शेतकरी, कामगारासह सर्वांचीच साथ लाभेल, असा विश्वास देखील मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी शुभेच्छा संदेशात नमूद केला आहे.

मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणतात, 'येणारे वर्ष सुख, समाधान आणि समृद्धी घेऊन येवो. महाराष्ट्राच्या प्रगतीची पताका अखंडीत फडकत ठेवण्याची ऊर्जा आणि उर्मी मिळत राहो, हीच मनोकामना. छत्रपती शिवाजी महाराज आणि अनेक थोर संतांच्या आशीर्वादाच्या छत्रछायेखालील महाराष्ट्राला आधुनिकीकरणाच्या या युगात जगातील सर्वोत्तम राज्य म्हणून अग्रेसर ठेवायचे आहे. आपल्या कष्टकरी, शेतकरी, कामगारांच्या राबणाऱ्या आणि कला-क्रीडा-साहित्य-संस्कृती क्षेत्रातील सर्जक हातांनी या राज्याच्या वैभवात भरच घातली आहे. हा लौकिक आपल्याला वाढवायचा आहे. शेती-माती व सिंचन, शिक्षण, आरोग्य, उद्योग- ऊर्जा, माहिती तंत्रज्ञान ते नवनव्या औद्योगिक क्रांती यांना पादाक्रांत करायचे आहे. यासाठी राज्यातील शांतता-सलोखा, परस्पर स्नेह, आदरभाव वृद्धिंगत होईल. पर्यावरण आणि जल-जंगल-जमीन यांचं जतन-संवर्धन होईल, असे प्रयत्न करायचे आहेत. हा संकल्प घेऊन वाटचाल करायची आहे, त्यासाठी नववर्ष चैतन्यदायी ठरेल. सकारात्मक ऊर्जेने भारलेल्या नवसंकल्पना घेऊन येईल. यातून आपला महाराष्ट्र आता थांबणार नाही, हा यत्न पूर्णत्वास जाईल. अशी मनोकामना करतो. तशी ईश्वरचरणी प्रार्थना करतो, असे नमूद करुन मुख्यमंत्री श्री फडणवीस यांनी शुभेच्छा देऊन सगळ्यांचे नववर्षाभिनंदन केले आहे.




## भीमा कोरेगाव स्मारकासाठी 200 एकर जमीन मिळावी – रामदास आठवले



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

कोरेगाव भीमा येथे (1 जानेवारी ) शौर्य दिन साजरा करण्यात येतो. राज्यभरातून अनेक अनुयायी या ठिकाणी उपस्थिती लावतात. येथील विजयस्तंभास अभिवादन करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांनी देखील हजेरी लावली .यावेळी माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी कविता सादर केली .

ते म्हणाले, भीमा कोरेगावची ऐकल्यानंतर शौर्यगाथा उंच होतो आमचा माथा. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आहे आमचा दाता, जो बाबासाहेब आंबेडकरांना विरोध करेल त्याला घालू आम्ही लाथा, कोरेगाव स्तंभाला मी सलाम करतो जाता जाता.ते पुढे म्हणाले, आमच्यासाठी आजचा दिवस फार महत्त्वाचा आहे. 207 वर्षापूर्वी आमच्या समाजाने शौर्य दाखवत पेशव्यांना पळून लावण्याचा प्रयत्न केला होता. त्याच्या प्रित्यर्थ या ठिकाणी स्मारक उभारण्यात आले आहे. या ठिकाणी डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर देखील दरवर्षी येत असत आता राज्य भरातून लाखो अनुयायी या ठिकाणी येतात.

भीमा कोरेगाव या ठिकाणी या शौर्य स्तंभाचं मोठं असं स्मारक होणे आवश्यक आहे.स्मारक करण्यासाठी सरकारने लक्ष घातलं आहे.

पण अद्याप स्मारक पूर्ण झालं नाही. त्यामुळे याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन निधी मंजूर करणार आहे. यासाठी 100 ते 200 कोटी मंजूर करण्या बरोबरच स्मारकासाठी 200 एकर जमीन मिळावी ही आमची मागणी आहे.

ज्यांची जमीन आहे, त्यांना ही मोबदला मिळाला पाहिजे, त्यांचं पुनर्वसन व्हावं असं देखील रामदास आठवले म्हणाले.

# जनसेवेच ध्यास असलेलं युवा नेतृत्व

## बापू दिनकर कातळे




पिंपरी-चिंचवड शहरातील किवळे परिसरात नव्या विचारांचा संकल्प अंगी बाणणारे, आरोग्य ,शैक्षणिक,क्रीडा ,धार्मिक,सामाजिक ,राजकीय, क्षेत्रात अथक केला परिश्रम करणारे नेतृत्व म्हणजे श्री. बापू दिनकर कातळे. आपल्या निस्वार्थी कार्याने एक नवीन विचारांचा संकल्पच मांडून परिसराचे रूपच पालटण्याचा निर्धार केला आहे.

धार्मिक आणि सामाजिक बांधिलकाचा वारसा लाभलेल्या श्री. बापु दिनकर कातळे यांनी समाजातील विविध क्षेत्रातील आणि घटकांतील गरज लक्षात घेऊन संकल्प फाउंडेशन या समजोपोयोगी संस्थेची स्थापना आणि समाजकार्याची मुहूर्तमेढच जणू रोवली. संकल्प फाउंडेशनच्या माध्यमातून अनेक आरोग्य ,शैक्षणिक,क्रीडा ,धार्मिक,सामाजिक उपक्रम राबवून नवीन विचारांचा संकल्प जणू अंगिकारला.

आरोग्य क्षेत्रातील उणीव समजून घेऊन त्यांनी परिसरातील नागरिकांचे आरोग्य सुधारण्यासाठी महाआरोग्य शिबिरे आयोजित केली व महानगरपालिकेच्या आरोग्य योजनांचा लाभ महिला ,बाळ व ज्येष्ठांपर्यंत पोहोचविला.ज्येष्ठ नागरिक संघ स्थापन करुन त्यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्यासाठी नवसंजिवनीच दिली.अंगणवाडी सेविकांना, अपंग व्यक्तींना वेळोवेळी मदत करुन करुन आरोग्य क्षेत्रात आपला ठसा उमटवला.

**शिक्षणशिवाय समाजाचा विकास अशक्य आहे.**

शैक्षणिक क्षेत्रातील उदासीनता पाहून विद्यार्थ्यांसाठी अनेक शैक्षणिक व त्यांच्या बुद्धीला चालना देणारे उपक्रम राबवले. त्याचबरोबर मुलांमध्ये सांघिक भावनेला बळ देण्यासाठी सांस्कृतिक कार्यक्रम,किल्ले स्पर्धा आणि विविध स्पर्धांचे आयोजन केले. विविध घटकांतील गरजू विद्यार्थ्यांना वेळोवेळी शैक्षणिक साधनाचे वाटप तसेच आर्थिक मदतही केली.

**“क्रीडा क्षेत्र हे तरुणाईचे प्रतिबिंब आहे."**

हे ललक्षात घेऊन क्रीडा क्षेत्रातही त्यांनी भरीव कामगिरी केली.तरुणाईच्या आवडत्या खेळांचे व विविध उपक्रमांचे आयोजन करुन तरुणांना प्रोत्साहन देण्याचा त्यांनी वेळोवेळी यशस्वी प्रयत्न केला.पारंपरिक खेळांसोबत आधुनिकतेची सांगड घालून अनेक क्रीडा उपक्रम यशस्वीरीत्या राबवून तरुणांचे क्रीडा क्षेत्रातील महत्व अधोरेखित करण्याचा प्रयत्न केला.

**"धार्मिक क्षेत्र सामाजिक एकतेचे प्रतीक आहे."**

सर्व धार्मिक क्षेत्रातही तितक्याच ताकदीने उपक्रम राबवून विविध कार्यकमांना वेळोवेळी उपस्थिती दर्शविली.धार्मिक उपक्रमांच्या माध्यमातून त्यांनी सर्व समाजाला एकत्र आणण्याचे काम आणि विविध धर्म, पंथातल्या आणि समाजातल्या कार्यक्रमांना उपस्थित राहून वेळोवेळी समाजातल्या एकोप्याची आणि सर्व धर्म समभावाची भावना सतत जागृत ठेवण्याचे काम केले.

**“समाज हा मानवी जीवनाचा आधारस्तंभ आहे "**

सामाजिक क्षेत्रामध्ये आपल्या प्रगल्भ राजकीय क्षेत्राचा आणि ओळखीचा उपयोग करुन अनेक शासकीय कल्याणकारी योजनांचा लाभ वंचित घटकांपर्यंत पोहोचवण्यासाठी त्यांनी अथक प्रयत्न केले. विशेषतः महिला सक्षमीकरणासाठी त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. लाडकी बहीण योजना, महिला बालकल्याण योजना, विधवा व घटस्फोटीत महिलांना अर्थसहाय्य अशा अनेक योजनांचा लाभ त्यांनी महिलांना मिळवून दिला.आधार कार्ड, मतदान कार्ड, नोंदणी, दुरुस्ती अशा अनेक समाजोपोयोगी सेवा त्यांनी जनसंपर्क कार्यालयाच्या माध्यमातून उपलब्ध करुन दिल्या.

राजकीय क्षेत्रात सलोखा आणि मैत्रीपूर्ण संबंध राखण्यासाठी सतत प्रयत्न केले आणि यामुळे समाजाचे हित साधण्यात यश मिळाले.राजकीय प्रतिस्पर्ध्यांसहही सौहार्दपूर्ण संबंध असल्याने त्यांनी राजकीय क्षेत्रात आपला प्रभाव वाढवला. विविध राजकीय पक्षांच्या नेत्यांसोबत मैत्रीपूर्ण संबंध जपून राजकीय स्थिरता निर्माण करण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.आपल्या राजकीय क्षेत्रातील प्रभावाचे नाणेही खणखणीत वाजवले.

अशा समाजातील विविध क्षेत्रात कार्यरत राहून समाजाच्या प्रत्येक घटकापर्यंत पोहोचणाऱ्या आणि समाजातील बांधिलकी आणि एकोपा टिकून राहावा यासाठी अहोरात्र झटणारे श्री. बापु दिनकर कातळे.

नव्या विचारांचा संकल्प हाती घेतलेल्या,युवकांचे प्रेरणास्थान,ज्येष्ठांचा आधारवड,महिलांचा सन्मान ,राजकारणाचा उगवता चेहरा,समाजाचा अभिमान असणाऱ्या श्री.बापू दिनकर कातळे यांना शहरातील मानाचा समजला जाणारा मेट्रोसिटी आयकॉन पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.









# अनेक महिलांना प्रेरणा देणारं व्यक्तिमत्व यशस्वी उद्योजिका

## सौ .अंकिता अनिल राऊत




महिलांनी यशस्वी उद्योजिका होण्यासाठी आपल्या अंगी कोणते गुण अंगीकारावे ? आपल्या कार्य कुशलतेने आपण कशा यशस्वी उद्योजिका म्हणून जगासमोर येऊ शकतो ? अश्या प्रश्नांची उत्तर देणार तसेच फावळ्या वेळात यशस्वी असा उद्योग उभा करून अनेकांना प्रेरणा देणार व्यक्तिमत्व म्हणजे सौ अंकिता राऊत. दिवाळी फराळ म्हटलं की आपल्या नजरेसमोर अनेक खाद्यपदार्थ येतात हे खाद्यपदार्थ बनविणारी पिंपरी चिंचवड शहरातील कंपनी म्हणजे सखी फूड प्रॉडक्ट या सखी फुड प्रोडक्टच्या संचालिका आहेत सौ अंकिता राऊत.

त्यांनी घरात आपण रिकाम्या वेळेत काहीतरी उद्योग सुरु करावा या उद्देशाने सखी फूड प्रॉडक्टची निर्मिती केली यासाठी प्रॉडक्टच्या माध्यमातून त्यांनी अनेक खाद्यपदार्थ तयार करण्यास सुरुवात केली. त्यांचे खाद्यपदार्थ दिवसेंदिवस प्रसिद्ध होऊ लागले, त्यांचे खाद्यपदार्थ इतके प्रसिद्ध झाले की भारतच नाही तर अन्य देशातही त्यांच्या खाद्यपदार्थांना मागणी वाढली,याच माध्यमातून अनेक बेरोजगार महिलांना त्यांनी रोजगार मिळवून दिला . अनेकांच्या उदरनिर्वाह चे साधन या निमित्ताने उपलब्ध करून दिले , सौ अंकिता राऊत यांनी आपल्या सखी फूड प्रोडक्टच्या माध्यमातून एक यशस्वी उद्योजिका होण्याचा मान मिळविला आहे. तसेच त्या पिंपरी चिंचवड शहरातील प्रसिद्ध आमंत्रण फिश या हॉटेलच्यासंचालिका ही आहेत अनेक महिलांना प्रेरणा मिळेल असा त्यांचा उद्योग विश्वातील प्रेरणादायी प्रवास त्यांनी आपल्या शब्दात मांडला आहे.





"मी आणि माझ्या वहिनीने जवळ जवळ 16 वर्षा पूर्वी 2008 साली दोघींनी मिळून विचार केला की आता मुलं मोठी झाली आहेत स्वतःचा अभ्यास स्वतः करतात म्हणून आता आपण मोकळ्या आहोत रिकामा वेळ जाता जात नाही फक्त टीव्ही बघत बसण्या पेक्षा काहीतरी आपण व्यवसाय करूयात म्हणून आम्ही विचार करु लागलो मग माझ्या लक्षात आले की आमच्या सोसायटी मध्ये काका काकू आहेत त्यांची चकली छान होती ते बऱ्या पैकी विकायचे त्यांच्या चकलीला मागणी खूप होती पण त्यांनी अचानक त्यांचा व्यवसाय बंद केला आम्ही त्यांना विचारले त्यांनी सांगितले की मुलांचं शिक्षण झाले नोकरीला लागले आत्ता कशाला कष्ट करायचं म्हणून आम्ही बंद केले मला नाही पटल पण असो प्रत्येकाचं मत मग आम्ही त्यांच्या कडून बेसिक माहिती घेतली आणि व आमचा चित्तास व्यवसाय सुरु केला आमची चकली ही खूप छान होत होती .

मागणी वाढत गेली असी जी सुरवत झाली ती आम्ही 16 वर्ष मागे वळून ही नाही बघितले चकली पासून चालू केलेले ते एक वर्षात 30 पदार्थ तयार करायला लागलो. सुरवातीला चकली ची मशीन घेतली, मग ड्रायर घेतले असे अनेक मशीन घेऊन 20 गरजू महिला हाताशी घेऊन आमच्या टेरेस वर छोटासा कारखाना तयार केला. मला आनंद आहे की माझ्या व्यवसाय बरोबर 20 घराची चूल पेटू शकली .

घरात कशाचीही कमी नसताना आपल्या आंनद करीत सुरु केलेला व्यवसाय मोठ्या प्रमाणात वाढला

मर. SKF मध्ये सर्व्हिस ला होते कसलीही कमी नव्हती खूप लोकांनी टोमणे सुद्धा दिले पण मी लक्ष नाही दिले म्हणून मी आज ``सखी फूड प्रॉडक्ट्स `` उभ करु शकले

आज सगळे देश आमचे सखी चे प्रॉडक्ट फिरून आले आहे दिवाळीत 15 दिवस आधी आमचे प्रॉडक्ट्स बाहेर देशात जातात, हो आणखी एक हा सगळा व्याप सांभाळत मी हॉटेल आमंत्रण फिश हे सुध्दा सांभाळते.

महिलांनी काही ठरवले कि आपण काही करायचं तर ते नक्की करु शकतात फक्त हार मानायची नाही प्रत्येक मध्ये काहींना काही गुणअसतातच फक्त आपल्या मधील गुण ओळखून व्यवसाय क्षेत्रात पाऊल ठेवायचं असत"



# रुग्णसेवेचे व्रत घेऊन आपला जीवन प्रवास सुरु करणारं व्यक्तिमत्व

## डॉ.सायली प्रवीण बारसे



**ज्या समाजात आपण राहतो त्या समाजाला आपण काही देणे लागतो, हा सेवाभाव मनात ठेवत समाजाच्या विकासासाठी तसेच समाजात आरोग्य राखण्याच्या दृष्टीने आपला जीवन प्रवास सुरु केलेलं व्यक्तिमत्व म्हणजे डॉक्टर सायली प्रवीण बारसे, डॉक्टर सायली बारसे यांनी 2020 मध्ये आपले एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले. बालपणापासूनच रुग्णांची सेवा करणे, आपल्या आसपास निरोगी वातावरण रहावे, याकरिता आपण डॉक्टर होणे गरजेचे असल्याचे त्यांना जाणवले, तसेच महिला व लहान मुलांसाठी आरोग्यसेवा द्यावी या दृष्टीने व जिद्दीने एमबीबीएस चे शिक्षण पूर्ण केले डॉक्टर सायली प्रवीण बारसे यांनी प्रथम पिंपरी चिंचवड शहरातील वायसीएम रुग्णालय, त्यानंतर वात्सल्य हॉस्पिटल भोसरी व भोसरी रुग्णालय या ठिकाणी त्यांनी आपल्या रुग्णसेवेचे व्रत सुरु केले.**

लहानपणापासूनच समाजसेवेची घरातूनच त्यांनी शिक्षा घेतली त्यांच्या मातोश्री या माजी नगरसेविका प्रियंका ताई प्रवीण बारसे व वडील प्रवीण बारसे यांचे समाजकार्य संपूर्ण पिंपरी चिंचवड शहराला ज्ञात आहे.

त्यांची कन्या म्हणजे डॉक्टर सायली प्रवीण बारसे याही समाजसेवेत मागे नाही, समाजसेवा करत असतानाच रुग्ण सेवा करणे महत्त्वाचे असल्याचे जाणवल्याने त्यांनी आपला हा रुग्ण सेवेचा प्रवास सुरु केला. त्या रुग्णसेवे बरोबरच आदर्श शिक्षण संस्थेच्या सदस्य म्हणून शिक्षण क्षेत्रात हि कार्य करतात, त्याचबरोबर त्यांनी इंडियन टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट ऑफ कॉस्मेटोलॉजी चे शिक्षण पूर्ण केले आहे. रुग्णसेवा व समाजसेवा करत त्यांचं स्त्री रत्न फाउंडेशन या सामाजिक संस्थे मध्ये ही त्या कार्यरत आहे. स्त्रीरत्न फाउंडेशन मध्ये त्या सेक्रेटरी म्हणून काम पाहतात ,या अंतर्गत त्यांनी महिलांसाठी, महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी ,तसेच महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक उपक्रम राबविले. मराठा समाजातील उच्च शिक्षित महिला म्हणून त्यांची समाजकार्याची दखल घेत, तसेच रुग्णसेवेची दखल घेत शिवनेरी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित भोसरी वतीने त्यांना यापूर्वीच गौरविण्यात आले आहे .तसेच पुढील काळात स्वतःचे रुग्णालय सुरु करण्याचा डॉक्टर सायली प्रवीण बारसे यांचा मानस असून आपल्या रुग्णालयामार्फत महिला, लहान मुले तसेच वंचित घटकांना आरोग्यसेवा देण्याचा त्यांचा मानस आहे.

मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड 2024

# महिला सक्षमीकरणासाठी नेहमी कार्यरत असणारं व्यक्तिमत्व

## सौ.ज्योती गोफणे





समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच समाजाचा विकास हवा असेल तर राजकारणात असणे आवश्यक असते असे म्हटले जाते राजकारणात असल्याने राजकीय पक्षाच्या माध्यमातून आपण समाजाचे सर्वांगीण विकास घडवू शकतो याच दृष्टिकोनातून पिंपरी चिंचवड शहरातील सौ.ज्योतीताई गोफणे या राजकारणात सक्रिय आहेत.

सौ. ज्योतीताई गोफणे या पिंपरी चिंचवड शहर राष्ट्रवादी अजित पवार गटाच्या शहर कार्याध्यक्ष आहेत. तसेच त्या राष्ट्रवादी पक्षाच्या बचत गट महासंघ सेलच्या शहराध्यक्ष म्हणून कार्यरत आहेत. त्यांनी आपला राजकीय जीवनप्रवास 2008 पासून सुरु केला आहे त्यांनी प्रथम 2012 मध्ये महाराष्ट्र नवनिर्माण सेना या राज ठाकरे यांच्या पक्षाच्या वतीने महानगरपालिकेची निवडणूक लढवली आहे. त्यानंतरच्या काळात 2014 पासून त्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून कार्यरत आहेत. त्यांना राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने प्रथम शहर उपाध्यक्ष पदावर काम करण्याची संधी मिळाली, त्यानंतर त्यांच्या कामाची दखल घेत राष्ट्रवादी पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष अजित पवार यांनी त्यांची कार्याध्यक्ष म्हणून निवड केली व पक्षाचे काम करण्याची संधी दिली. तसेच 2024 मध्ये राष्ट्रवादी पक्षाच्या बचत गट महासंघ यांच्या शहराध्यक्ष म्हणून त्यांना पक्षाच्यावतीने जबाबदारी देण्यात आली. त्या सध्या या पदावर चांगल्या पद्धतीने काम करत असून बचत गटाचे एकत्रीकरण करण्याचा त्यांचा मानस आहे तसेच महिलांना रोजगार कसा मिळेल ,महिला या सर्वतोपरी सक्षम कशा होतील यासाठी त्यांचे प्रयत्न सुरु आहेत.

सौ ज्योती गोफणे यांनी आपल्या राजकीय प्रवासात अनेक सामाजिक उपक्रम राबविले यामध्ये महिला सक्षमीकरण, महिलांना रोजगार तसेच समाजात आरोग्य च्या दृष्टिकोनातून त्यांनी अनेक आरोग्य शिबिरांचे आयोजन केले, तसेच नोकरी महोत्सव या माध्यमातून अनेक युवक युवतींना रोजगार मिळावा यासाठी त्यांनी प्रयत्न केले ,तसेच महिला बचत गट कशाप्रकारे सक्षम होतील या महिला बचत गटातील महिलांना रोजगार निर्मिती करुन त्यांनी निर्माण केलेल्या वस्तूंना बाजारपेठ कशी मिळेल यासाठी त्या नेहमी प्रयत्नशील असतात त्यांच्या या कार्याची दखल अनेक सामाजिक संस्थांनी घेतली असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.









मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड 2024

# आपल्या सामाजिक कार्याने अनेकांना प्रभावित करणारं व्यक्तिमत्व

## शोभा उर्फ नानी जगताप



**सामाजिक राजकीय क्षेत्राबरोबरच स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी तसेच शेकडो महिलांचे उध्वस्त होणाऱ्या संसाराला योग्य मार्गदर्शन करून परत संसाराचा गाडा सुरळीत करणाऱ्या पिंपळे निलख च्या च्या शोभा उर्फ नाणी जगताप यांनी आपल्या सामाजिक कार्याने सर्व क्षेत्रातील लोकांना प्रभावित केले आहे. त्यांच्या याच कार्याची पावती म्हणून त्यांना विविध क्षेत्रातील संस्थांच्या वतीने अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे.**

शोभा जगताप उर्फ नानी यांनी आपल्या सामाजिक कार्याची सुरुवात 1990 मध्ये सुरु केली त्यांनी आपल्या गुरु डॉक्टर नीलम गोऱ्हे यांच्या मार्गदर्शनाखाली महिला व मुलींवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडत ,त्यांना न्याय देण्यासाठी त्या लढत आहेत याचबरोबर महिलांचे सबलीकरण व्हावे यासाठी त्यांनी स्वाभिमान नावाने बचत गट स्थापन करून त्या माध्यमातून रोजगार मिळवून दिला आहे. तसेच त्यांनी अनेक बचत गट स्थापन केले या बचत गटांच्या माध्यमातून महिलांना विविध कौशल्याचे प्रशिक्षण देऊन ,स्वतःच्या पायावर उभे केले आहे. तसेच ज्या महिलांना आधार नाही अशा महिलांना न्यायव्यवस्थेकडून न्याय मिळवून देण्याचे कार्य त्यांनी केले आहे.शोभा जगताप या आपले घर सांभाळत त्यांनी समाजसेवेच्या दृष्टिकोनातून स्त्री आधार केंद्र ची स्थापना केली या स्त्री आधार केंद्रमार्फत शेकडो महिलांचे प्रश्न त्यांनी सोडविले, तसेच ग्रामीण भागातील नागरिकांना ग्रामपंचायत कामकाजाचे प्रशिक्षण दिले.माणसाने शिक्षण घेतले म्हणून माणूस मोठा होत नाही तर चांगल्या विचाराने तो मोठा होतो त्यामुळे आपल्या वर्तनात चांगले बदल करायला हवे असा सल्ला त्या नेहमी देत असतात.ज्या महिलांना पतीने सोडले त्या महिलांच्या पोटगीसाठी त्या नेहमी झटत असतात महिलांना न्याय मिळवून देत त्यांचे आयुष्य सावरण्याचे मोलाचे कार्य शोभा जगताप करत आहेत, तसेच त्यांनी आजपर्यंत अनेकांचे उध्वस्त होत असलेले संसार आपल्या मार्गदर्शनाने उभे केले आहे. विशेष म्हणजे कर्करोगा सारख्या अति दुर्धर आजारावर मात देत त्यांनी आपले सामाजिक कार्य सुरूच ठेवले आहे. सामाजिक कार्यात त्यांचा उत्साह पाहता त्यांच्या कार्याची दखल अनेक सामाजिक संस्थांनी घेतली. त्यांना आजपर्यंत रमाई महिला पुरस्कार रमाईची लेक , भिमाई माता , पृथ्वीराज साठे पुरस्कार , सर्पमित्र पुरस्कार अशा विविध सामाजिक क्षेत्रातील अनेक पुरस्कार मिळाले आहेत. याचबरोबर पोलीस महिला संघटना, महिला दक्षता कमिटी स्थापन करून या मार्फत त्यांनी अनेक महिलांना न्याय मिळवून दिला आहे. त्यांच्या या कार्यासाठी त्यांचा अनेक स्तरातून सन्मानही केला जात आहे.









मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड 2024

## महिलांचे सक्षम नेतृत्व

# सौ.ज्योतीताई सचिन निंबाळकर

पिंपरी चिंचवड शहरात महिलांचे सक्षम नेतृत्व म्हणून ज्योतीताई सचिन निंबाळकर यांचे नाव नावारूपास आले आहे. ज्योती सचिन निंबाळकर या राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाच्या पिंपरी चिंचवड शहराच्या महिला शहर अध्यक्ष आहेत.

त्यांनी आपल्या राजकीय जीवनाची सुरुवात 2022 पासून सुरु केली 2022 ते 2024 या दोन वर्षातच त्यांनी आपल्या कार्यकर्तृत्वाने नवलौकिक मिळविले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी अनेक सामाजिक उपक्रम राबविली. यामध्ये महिला सक्षमीकरण महत्त्वाचे समजले जाते. तसेच त्यांच्या या राजकीय कार्यकाळात त्यांनी लहान मुलांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन केले यामध्ये चित्रकला स्पर्धा , जिल्हास्तरीय थायबॉक्सिंगच्या स्पर्धा, डान्सच्या स्पर्धा, बॉक्सिंग च्या स्पर्धा आहेत. कष्टकरी कामगार महिलांचा सन्मान, चिंचवड गावच्या स्मशानभूमीच्या कामाला गती मिळावी यासाठी केलेले प्रयत्न ,वार्डामध्ये पेविंग ब्लॉक बसवून घेणे, भटक्या शाळांचा उपद्रव कमी होण्यासाठी केलेले प्रयत्न, सफाई कामगारांचा सन्मान, अनेक वेळा मोठमोठ्या आंदोलनांच्या माध्यमातून पुढाकार, तसेच महिलांसाठी कॅन्सरची शिबिर, मोफत नेत्र चिकित्सा शिबिर, मोतीबिंदूचे मोफत ऑपरेशन करून देत, रक्तदान शिबिरे, कंपोस्ट खत ट्रेनिंग कार्यशाळा महिलांसाठी पेट्रोल पंप प्रशिक्षण कार्यशाळा हलव्याचे दागिने हेअर ब्रॉच बनवणे वेगवेगळ्या प्रकारचे केक फॅशन डिझाइनिंग याचे मोफत क्लासेस अशा वेगवेगळ्या आरोग्य शिबिर महिलांसाठी उपलब्ध करून दिलेत.

वाढदिवसानिमित्त मातृ सेवा अनाथ आश्रम असेल किंवा ममता बालाश्रम अन्नधान्याची मदत कोकण पूरग्रस्तांना जागेवर जाऊन 500 किड्स वाटप करण्यात आलं.

त्यांनी आपल्या प्रभागात अनेक उपक्रम राबवून प्रभागातील समस्यांचे निराकरण केले आहे अनेक शहरातील प्रश्नांवर महानगरपालिके च्या चुकीच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत आंदोलने केली त्यांच्या अनेक आंदोलनांना यश प्राप्त झाले.

राजकारण व समाजकारण करत असताना त्यांनी नेहमीच समाजकारणाला महत्त्व दिले.महिला बचत गटाच्या माध्यमातून महिलांना सक्षमीकरण करण्याचे कार्य ज्योतीताई निंबाळकर यांनी हाती घेतले आहे. राष्ट्रवादी पक्षाच्या माध्यमातून अनेक महिलांची संघटन करून महिला सक्षमीकरणाचे अभियान त्या राबवीत आहेत








## सामाजिक कार्यात अग्रेसर असणारं व्यक्तिमत्व

# सौ.ज्योतीताई संदीप भालके

शहर प्लास्टिक मुक्त व्हावे तसेच शहरातील नदी स्वच्छता अभियानात सहभाग घेऊन नदी प्रदूषण थांबविण्यासाठी सक्रिय सहभाग घेणे निराधार महिलांना शासकीय योजना मिळवून देणे बेरोजगार महिलांना रोजगार उपलब्ध करून देणे महिलांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून आरोग्य शिबिर आयोजित करणे अशा अनेक सामाजिक उपक्रमात आपल्या स्वतःच्या कार्यकर्तृत्वाची झलक दाखविणाऱ्या ज्योतीताई संदीप भालके या शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या उपशहर संघटिका म्हणून पिंपरी चिंचवड शहरात कारण आहेत तसेच जिजाऊ सोशल फाउंडेशन या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून त्या सामाजिक कार्य करत आहेत जिजाऊ सोशल फाउंडेशनच्या त्या अध्यक्ष आहेत तसेच त्या जिजाऊ महिला मंच चालवितात या माध्यमातून महिलांना विविध प्रकारच्या व्यवसायात सामावून घेऊन महिला सक्षमीकरण करण्याचे काम ज्योतीताई भालके करत आहेत. मागील दहा वर्षापासून त्या राजकीय जीवनात सक्रिय आहेत लोकसभा निवडणूक असो की विधानसभा निवडणूक यामध्ये त्यांचा शिवसेना पक्षाच्या प्रचारासाठी सक्रिय सहभाग राहिला आहे तसेच महिलांवर होत असलेल्या अत्याचारावर बंधने आणण्यासाठी त्यांनी अनेक आंदोलने केली ज्या महिलांना न्याय हवा आहे अशा महिलांसाठी त्या न्याय देण्यासाठी नेहमी अग्रेसर असतात त्यांनी अनेक महिला बचत गटांची स्थापना केली आहे. तसेच पिंपरी चिंचवड शहर प्लास्टिक मुक्त करण्यासाठी रोटरी क्लबच्या माध्यमातून एक लाख पिशवीचे वाटप करणे मध्ये त्यांनी स्वखर्चाने सहभाग घेतला व आपल्या प्रभाग क्रमांक 17 मधील नागरिकांना 5000 कापडी पिशवीचे वाटप केले.नदी स्वच्छतेसाठी बचत गट भजनी मंडळाच्या माध्यमातून एकत्र येऊन नदी स्वच्छ अभियानात सहभागी.

प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांसाठी वेगवेगळे आरोग्य शिबिरे राबवून 1000 लोकांचे मोतीबिंदूत शस्त्रक्रिया पूर्णपणे मोफत करून दिल्या. कोरोना काळात अन्नधान्य वाटप केले. अनाथ आश्रम,वृद्धाश्रम यांना वेळोवेळी गरजेच्या वस्तू व अन्नधान्याचे वाटप केले. तरुणांना रोजगाराची संधी मिळण्यासाठी रोजगार मेळाव्याचे आयोजन ,कष्टकरी कामगारांना शासकीय योजनेचा लाभ मिळवून देणे, प्रभागातील अनेक समस्यांचे निराकरण करून ते सोडवण्याचा प्रयत्न केला. जिजाऊ सोशल फाउंडेशन च्या माध्यमातून कापडी पिशवी गृह उद्योगाची स्थापना करून महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध केले. महिलांसाठी दरवर्षी ब्रेस्ट कॅन्सरची तपासणी ही पूर्णपणे मोफत करून देण्याचे काम अविरत पाने सुरु आहे वाल्हेकर वाडीच्या शाळेत 6 महीने शिक्षकांची कमतरता होती त्याचा पाठपुरावा करून शिक्षक मिळवून दिले.

महिलांवरील होणाऱ्या अत्याचारावर वेगवेगळ्या प्रकाराच्या आंदोलनांमध्ये नेहमी सहभाग घेणे.

प्रभागातील पाणी प्रश्नावर नेहमीच वारंवार अधिकाऱ्यांना भेटून तो सोडवण्याचा सातत्याने प्रयत्न करीत आहे









## कौटुंबिक हिंसाचारामुळे शोषित व पीडित असलेल्या महिला -पुरुष व कुटुंबातील सदस्यांसाठी नवसंजीवनी ठरलेल्या

# ॲड.कांता गोर्डे - शेजवळ

### यांना मानाचा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार -2024 जाहीर

कौटुंबिक हिंसाचाराने पीडित असलेल्या महिला व पुरुषांसाठी नवसंजीवनी ठरल्या आहेत ॲड.कांता गोर्डे - शेजवळ मॅडम,त्या पिंपरी चिंचवड शहरातील नामांकित वकील आहेत त्या सध्या महाराष्ट्र अँड गोवा राज्य नोटरी असोसिएशन भोसरी विभागाची सेक्रेटरी या पदावर कार्यरत आहे. याच बरोबर त्या भारतीय पत्रकार संघ लिगल विंग पिंपरी-चिंचवड शहराध्यक्ष आहे. तसेच त्यांनी पिंपरी-चिंचवड ॲडव्होकेट बार असोसिएशनच्या माजी सेक्रेटरी म्हणून काम पाहिले आहे. तसेच पॉश कमिटी व ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटी वर नामांकित हॉस्पिटल मध्ये सदस्य आहेत व विविध बँकेच्या पॅनल वर त्या कायदेशीर सल्लागार म्हणून काम करत आहेत. तसेच जमिनीचे कोणतेही वादाचे प्रश्न, सोसायटी धारकांचे वादविवाद व फ्लॅटचे करारनामे, तसेच त्यासंबंधी असलेली कायदेशीर सर्व कामे नोंदणी कृत खरेदीखत, करारनामे व नोटरीची सर्व कामे त्या करतात. त्यातही त्यांना सखोल ज्ञान व अभ्यास आहे. दिवाणी व फौंजदारीं क्षेत्रातील अतिशय गुंतागुंतीचे व कठीण प्रकरणे व केसेस त्यांनी चालवले असून कायदेशीर न्याय पक्षकार यांना मिळवून दिला आहे .

माहेरच्या गावातून त्या पहिल्या महिला वकील व नोटरी भारत सरकार त्या झालेल्या आहेत. लग्नानंतर पतीच्या नोकरी निमित्त त्या भोसरी पुणे येथे गेली चोवीस वर्षा पासून स्थानिक आहेत, त्यामुळे भोसरी येथील सिनियर वकील व नोटरी कांता गोर्डे - शेजवळ यांना पिंपरी चिंचवड शहरात मानाचा समजला जाणारा मेट्रो सिटी आयकॉन पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. त्या वकिलीच्या अभ्यासक्रमात पुणे विदयापीठशी संलग्न असणाऱ्या सर्व लॉ कॉलेज मधून मेरिट लिस्ट मध्ये नवव्या क्रमांकात येऊन त्यांना डीस्टिंगशन मिळाले आहे, सदर शिक्षण त्यांनी मुलगा झाल्यावर पूर्ण केले, स्वतः त उच्च शिक्षित होऊन मुलाला ही उच्च शिक्षण दिले तो ही सॉफ्टवेअर इंजिनियर असून एका नामांकित परदेशीं कंपनीत काम करत आहे व त्यांचे पती जनरल मॅनेजर या पदावर कार्यरत आहेत.त्यांनी आपल्या बद्दल माहिती देताना सांगितले कि मी लग्नानंतर तब्बल 7 वर्षांनी वकिली साठी प्रवेश घेतला व वकिली शिक्षण पूर्ण केले त्यासाठी मला माझे आई -वडील , भाऊ तसेच पती व मुलगा यांनी भक्कम साथ दिली व सहकार्य केले व आजही करत आहे. कौटुंबिक हिंसाचाराने पीडित व शोषित असलेल्या गरीब व गरजू महिलां - पुरुषसाठी व सिनियर सिटीझन यांना त्यांच्याकडून मोफत मार्गदर्शन केले जाते.



दर गुरुवारी दोन तास त्या ऑफिस मध्ये मोफत कायदेशीर सल्ला व मार्गदर्शन करून आर्थिक दुर्बल असलेल्या महिलांच्या केसेस कमी फी घेऊन त्या चालवतात व सहकार्य करतात. महिलांचे कौटुंबिक हिंसाचारापासून संरक्षण कायदा -2005, पॉश कायदा,निगोशीएबल इन्स्ट्रुमेंट ऍक्ट, सर्व मॅट्रिमोनियल कायदे, प्रॉपर्टी विषयक कायदे, कन्व्हेसिंग डॉक्युमेंटस, सिव्हिल, क्रिमिनल संबंधित सर्व दावे त्या चालवतात . त्यांनी अनेक महिलांना व पक्षकार यांना न्याय मिळवून दिला आहे व खुप सारे संसार व कुटूंब समजोता व तडजोड करून एकत्र आणले आहे, ते पक्षकार आता आनंदी जीवन जगत आहे.खरं तर तोडण्यापेक्षा जोडणे कधीही चांगले या तत्वाने त्या काम करतात.त्यामुळे त्यांना रणरागिणी महाराष्ट्राची, सन्मान नारी शक्तीचा, बेस्ट टॅलेंटेड महिला वकील,लोकमत द ग्रेट लीगल माईंड्स अवॉर्ड व इतर अनेक संस्थानी आतापर्यंत सन्मानित करून पुरस्कृत केले आहे.



# उत्तमोत्तम रुग्णसेवा देणारे निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटल



रोजच्या आयुष्यात अनेक आजार आहेत, ज्यांना आधुनिक वैद्यकशास्त्रात उपचार नाहीत तसेच बऱ्याववेळा उपचारांचे दुष्परिणामही उद्भवतात. त्यामुळे, रुग्ण आयुर्वेदाकडे आकर्षित होत आहेत. कारण, त्यांना हे समजले आहे की, आयुर्वेदिक उपचारात कमीतकमी दुष्परिणाम आहेत. रुग्णांची आयुर्वेदिक उपचारांची गरज लक्षात घेऊन 2010 मध्ये निर्विकार आयुर्वेद क्लिनिकची सुरुवात झालो. अल्पावधीतच रुणांचा वाढता प्रतिसाद पाहून 2018 मध्ये निर्विकार सुपरस्पेशलिटी हॉस्पिटल सुरु झाले; तर चालू वर्षी 2024 पासून निर्विकार वेलनेस सेंटरची सुरुवात झाली.

डॉ. नीलेश लोंढे आणि डॉ. सारिका लोंढे यांच्या प्रयत्नातून साकारण्यात आलेल्या निर्विकार आयुर्वेदिक क्लिनिकचा विस्तार हा निर्विकार आयुर्वेदिक सुपरस्पेशलिटी हॉस्पिटलमध्ये झाला असून उत्तमोत्तम रुग्णसेवा पुरवित अल्पावधीतच रुग्णांच्या मनात घर केले आहे. आधुनिक जीवनशैलीमुळे दिवसेंदिवस वाढणारा ताण-तणाव, नैराश्यांसारख्या समस्यांना दूर ठेवण्यासाठी 19 एप्रिल 2024 रोजी निर्विकार वेलनेस सेंटरची स्थापना करण्यात आली.

**केवळ शरीरच नव्हे तर मन, बुद्धीचाही विचार**

हल्लीच्या स्पर्धात्मक युगात वाढल्या ताणतणावामुळे मेटाबोलिक डिसऑर्डर (चयापचय समस्या), मधुमेह, थायरॉईड, रक्तदाब, सांध्यांचे व मणक्याचे विकार, वंध्यत्व अशा विकारांनी डोके वर काढले आहे. निरोगी जीवनशैली आणि चांगल्या आरोग्यासाठी आता नागरिकांचा आयुर्वेदाकडे कल वाढू लागला आहे. फक्त शरीरच नाही; तर मन, बुद्धी, आत्मा आणि शरीर या सर्वांचाच विचार करून रुग्णावर उत्तम उपचार करणाऱ्या आयुर्वेदाचे एक वेगळेच महत्त्व आहे. आयुर्वेदाने आजार मुळापासून बरा होण्यास मदत होते. बाबी खात्री आता लोकांना पटली आहे.आयुर्वेदिक उपचारात केवळ लक्षणांवर उपचार न करता प्रत्येक आजाराच्या मुळाशी जाऊन तो आजार बरा करण्याचा प्रयत्न केला जातो. आयुर्वेदिक चिकित्सा ही विविध आजारांवर फायदेशीर ठरते आहे. यामध्ये विविध मेटाबोलिक डिसऑर्डर, स्पाईन डिसऑर्डर, त्वचारोग अशा विविध आजारांवर आयुर्वेदिक उपचार केले जातात. निर्विकार आयुर्वेदिक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलच्या माध्यमातून विविध आजारांवर प्रभावी उपचार, पंचकर्म, योग, आहाराबाबत मार्गदर्शन, आयुर्वेदाबद्दल जागृती निर्माण करण्यासाठी विविध विनामूल्य तपासणी शिबिरे अशा विविध उपक्रम राबविण्यात येतात.

**आयुर्वेदिक उपचारांसाठी वैद्यकीय विमा**

आयुर्वेद शास्त्र आता अनेक कसोट्यांवर सिद्ध होताना दिसत आहे. अनेक आजारांवर प्रभावी पणे उपचार होऊन उत्तमोत्तम रिझल्ट मिळताना दिसत आहे, याचबरोबर अनेक विमा कंपन्या आता आयुर्वेदिक औषधी व पंचकर्म उपचारांना कॅशलेस स्वरुपात किंवा विमा परतावाच्या स्वरुपात सेवा द्यायला सुरवात केली व सेंट्रल हैल्थ स्कीम च्या अंतर्गत केंद्रीय कर्मचाऱ्यांना सुद्धा ही सेवा उपलब्ध झालेली आहे. लवकरच एक्स सर्व्हिसमनसाठी निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटलमध्ये ही सेवा सुरु होणार आहे.




## या सुविधांचा लाभ घेता येणार आयुर्वेद जनरल मेडिसिन

**स्त्रीरोग,लठ्ठपणा,पंध्यत्व,थायरॉईड समस्य, हृदयविकार, मधुमेह,मणक्यासंबंचित समस्या,कर्करोग ,फुफ्फुसासंबंधितविकारत्वचारोग,सौदर्योपचार, बालरोग,मूळव्याध,व्यसनमुक्ती उपचार,डोळ्यांच्या समस्या,संधीवात गर्भ संस्कार**



**विविध विमा योजनांचा लाभ**

अलीकडच्या काळात विविध विमा कंपन्या देखील आयुर्वेदिक उपचारांना मान्यता देत आहेत आणि तसेच कैशलेस इन्शुरन्स सुद्धा आयुर्वेदासाठी उपलब्ध आहेत. जसे की, एचडीएफसी एर्गो, एसबीआय जनरल इन्श्युरन्स, बजाज अलियांज इत्यादी. निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये रुग्णाला या विविध विमा योजना अंतर्गत लाभ देखील घेता येतो.

**एनएबीएच मानांकन**

नॅशनल अक्रिडेटेशन बोर्ड ऑफ हॉस्पिटलच्या (NABH) वतीने देण्यात येणारे 'एनएबीएच' मानांकन हे निर्विकार आयुर्वेद हॉस्पिटलला मिळाले असून येथे सम्णाला उत्तम दर्जाची सुविधा उपलब्ध करुन दिली जात असल्याचे ते निदर्शक आहे

**गंभीर आजारांवरही उपचार**

शरीरातील गंभीर आजार जसे की, कर्करोग, वंध्यत्व, लठ्ठपणा, सांधेदुखी, थायरॉईड यासारख्या आजारांवर आयुर्वेदिक उपचार घेण्याचा रुग्णांचा कल वाढत आहे. या सर्व आजारांवर आहार, व्यायाम, औषध आणि झोप या चार गोष्टींचे व्यवस्थापन करुन प्रत्येक रुग्णाला उत्तम आरोग्य मिळवून देण्याचा प्रयत्न केला जातो.

**मुळापासून आजार बरा करण्यासाठी पंचकर्म चिकित्सा**

आयुर्वेदामध्ये पंचकर्म चिकित्सेला एक विशेष महत्त्व दिलेले आहे. कोणताही आजार पुन्हा बळावू नये आणि आजाराला मुळापासून बरा करण्यासाठी पंचकर्म चिकित्सा फायदेशीर ठरते. निर्विकार आयुर्वेदिक मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये खालील सर्व पंचकर्माचा अनुभव वर्षानुवर्षे रुग्ण घेत आहेत.

वमन,विरेचन ,बस्ती,नस्य ,रक्तमोक्षण,कटी बस्ती,मन्या बस्ती,शिरोधारा ,तक्रधारा,स्नेहन स्वेदन आणि बरेच काही.

**वैद्यकीय इतिहास जाणून उपचार**

निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये प्रत्येक येणाऱ्या रुग्णाला सुरुवातीला एक केस रेकॉर्ड फॉर्म भरावा लागतो, जेणेकरुन त्या रुग्णांचा वैद्यकीय इतिहास जाणून घेता येईल. त्यानंतर, पुढील समुपदेशनासाठी रुग्णांना डॉक्टरांकडे पाठवले जाते. डॉक्टर रुग्णांचा आहार, विहार म्हणजेच व्यायाम, झोप आणि रुग्णाच्या आजारानुसार त्यावर औषधोपचार करतात. रुग्णाच्या आजाराची स्थिती पाहून त्याला योग्य उपचार मिळविण्यासाठी पंचकर्म उपचार सुचविले जातात. अशा प्रकारे रुग्णाचे स्वास्थ टिकवण्यासाठी आणि रुग्णाचा आजार मुळापासून बरा करण्यासाठी निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटल विविध उपचार करते.

**गुंतागुंतीच्या आजारांवरही उपचार**

निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये गुंतागुंतीच्या आजारांवरही प्रभावी उपचार करण्यात आले आहे. सोरायटिक संधिवाताने ग्रासलेला एक रुण हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. त्या रुग्णांवर आयुर्वेदिक औषधे, पंचकर्म चिकित्सेच्या मदतीने यशस्वी उपचार करण्यात आले आणि रुग्ण स्वतःच्या पायांवर उभा राहून, कोणाचाही आधार न घेता चालू लागता. वंध्यत्व,दमा, सांध्यांचे विकार, मणक्याच्या विकारांनी ग्रस्त असलेले विविध रुग्णांसाठी निर्विकार आयुर्वेदिक हॉस्पिटलमध्ये उत्तम उपचार पुरविले जातात.

**आयुर्वेदाबाबत गैरसमज दूर करा**

आयुर्वेदिक उपचारांचा परिणाम हा उशिराने होती, असा समाजामध्ये पसरलेला एक मोठा गैरसमज आहे. आयुर्वेदात अनेक उपचार पर्याय आहेत ज्यांचे परिणाम त्वरित होतात. आयुर्वेदिक औषधे हे आयुर्वेदिक चिकित्सकाच्या सल्ल्याप्रमाणे घेतली; तर आयुर्वेदिक चिकित्येचे दुष्परिणाम होत नाही.

**आयुर्वेदावरील विश्वास आणखी वृद्धिंगत होणार**

ऋषी-मुनी आणि वेदांत सांगितलेले आयुर्वेद ही आपली परंपरा आहे. आयुर्वेदाच्या माध्यमातून सर्व रोगोपचार मिळू शकतो आणि त्यासाठी केंद्र सरकारने आपली परंपरा असलेले आयुर्वेद पुढे नेण्याचे ठरविले आहे. केंद्र सरकारचे आयुष मंत्रालय ज्याप्रमाणे भारतामध्ये सध्या काम करत आहे; ते पाहून आम्हाला खात्री आहे की, गेल्या काळात आयुर्वेदावरील रुग्णांचा विश्वासः आणखीनच वृद्धिंगत होईल.

**डॉ.नीलेश लोंढे** एम.डी.आयुर्वेद,पी.एच.डी (स्कॉलर)
**डॉ.सारिका लोंढे** एम.डी.आयुर्वेद,योगशिक्षिका
निर्विकार आयुर्वेद सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल'
जय गणेश साम्राज्य,भोसरी,पुणे
संपर्क : 7447476686/7447476586

# अजित पवार व शरद पवार येणार एकत्र ?



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : शरद पवार व अजित पवार एकत्र यावेत, यासाठी पंढरपूर येथील विठ्ठलाच्या मंदिरात आज अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी प्रार्थना केली तर अजित पवार राष्ट्रवादी गटाचे मंत्री नरहरी झिरवळ यांनीही शरद पवार व अजित पवार एकत्र यावे, यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे सांगितले आहे. वेळ पडली तर आपण शरद पवार यांना भेटून त्यांच्या पायाशी लोटांगण घालू असेही नरहरी झिरवळ यांनी सांगितल्याने आता या नवीन वर्षात शरद पवार व अजित पवार एकत्र येणार का? असा सवाल अख्ख्या महाराष्ट्राला पडला आहे.

विधानसभेच्या निवडणुकीनंतर राज्यात महायुतीचं सरकार सत्तेत आलं. त्यानंतर मंत्रिमंडळाचा विस्तारही झाला. तसेच खातेवाटपही करण्यात आलं. मात्र, यानंतरही अद्याप महायुतीच्या काही मंत्र्यांनी मंत्रिपदाचा पदभार स्वीकारलेला नाही. आज राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) पक्षाचे नेते तथा मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अन्न व औषध प्रशासन मंत्रिपदाचा पदभार स्वीकारला. यानंतर बोलताना मंत्री नरहरी झिरवाळ यांनी अजित पवार आणि शरद पवार यांनी एकत्र यावं, अशीही इच्छा व्यक्त केली. तसेच मंत्रिपदाचा पदभार स्वीकारल्यानंतर नरहरी झिरवाळ यांनी केलेलं एक विधान चांगलंच चर्चेत आलं आहे. “शरद पवारांना सोडून अजित पवारांबरोबर गेल्यापासून आजपर्यंत शरद पवारांची भेट घेतली नाही. पण आता शरद पवारांना भेटून लोटांगण घालून पाया पडणार आहे”, असं नरहरी झिरवाळ यांनी म्हटलं आहे.

**अजित पवार यांच्या मातोश्रीने घातले विठ्लाला साकडे**

पवार कुटुंबांमध्ये जो काही वाद आहे, तो वाद संपू दे आणि पुन्हा सर्व पवार एकत्र येऊ देत, अशी प्रार्थना उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मातोश्री आशाताई पवार यांनी विठुराया चरणी केली. नवीन वर्षाच्या सुरुवातीला त्यांनी विठुरायाचे आणि रुक्मिणीमातेचे दर्शन घेतले. महाराष्ट्राच्या राजकारणात शरद पवार आणि अजित पवार यांच्यातील राजकीय कटुता सर्वश्रुत आहे. लोकसभा निवडणूक असो की विधानसभा निवडणूक; बारामतीमधून पवार विरुद्ध पवार, असा सामना रंगल्याचे चित्र पाहायला मिळाले. पवार कुटुंबांनी एकत्र यावे यासाठी आता पुन्हा एकदा प्रयत्न सुरु झाले आहेत. त्याचाच एक भाग म्हणून नवीन वर्षाच्या पहिल्याच दिवशी अजित पवार यांच्या मातोश्रींनी पांडुरंगाचे दर्शन घेतले.

**बावनकुळे यांची प्रतिक्रिया**



शरद पवार आणि अजित पवार एकत्र येण्यास भाजपाची नकार असण्याचे काही कारण नाही, असे बावनकुळे म्हणाले आहेत. अजित पवारांच्या मातोश्रींनी पांडुरंगाकडे अजित पवार आणि शरद पवार एकत्र यावेत असे साकडे घातल्याबद्दल बावनकुळे यांना प्रश्न विचारण्यात आला होता. याला उत्तर देताना ते म्हणाले की, शरद पवार आणि अजित पवार यांच्याबद्दलचा निर्णय त्या दोघांनीच घ्यायचा आहे. भारतीय जनता पार्टीकडून ना असण्याचं काही कारण नाही. त्या पक्षाने, त्यांच्या नेत्यांनी निर्णय घ्यायचा आहे. त्यामुळे त्यांच्या निर्णयात मी काही बोलणं योग्य नाही.”

# मोशी येथे रविवारी इंद्रायणी साहित्य संमेलन

## रामदास काकडे यांच्या हस्ते भूमिपुत्र पुरस्कार वितरण सोहळा

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी, पुणे (दि. 1 जानेवारी 2025) मोशी येथे इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या तिसऱ्या इंद्रायणी साहित्य संमेलनाचे उद्घाटन रविवारी (दि.5 जानेवारी 2025) सकाळी आठ वाजता, देहू आळंदी रस्त्यावरील कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी, जय गणेश बँक्वेट हॉल, मोशी येथे होणार आहे. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते संमेलनाचे उद्घाटन होणार आहे. ज्येष्ठ ग्रामीण साहित्यिक दादाभाऊ गावडे संमेलनाध्यक्ष पद भूषवणार आहेत. तर स्वागत अध्यक्ष म्हणून वंदना हिरामण आल्हाट यांची निवड करण्यात आली आहे अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेचे अध्यक्ष संदीप तापकीर, सचिव रामभाऊ सासवडे आणि निमंत्रण अरुण बोऱ्हाडे यांनी दिली. बुधवारी मोशी नागेश्वर मंदिर, येथे आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेस उपाध्यक्ष डॉ. सीमा काळभोर, कार्याध्यक्ष सोपान खुडे, सदस्य डॉ. पौर्णिमा कोल्हे, एव्हरेस्टवीर श्रीहरी तापकीर व इतर सदस्य उपस्थित होते.उद्घाटनापूर्वी श्री नागेश्वर महाराज मंदिर ते कवयित्री बहिणाबाई चौधरी साहित्य नगरी (संमेलन स्थळ) पर्यंत सकाळी आठ वाजता ग्रंथदिंडी काढण्यात येणार आहे. या ग्रंथदिंडीचे उद्घाटन विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूरचे सदस्य ॲड. माधवी निगडे यांच्या हस्ते होणार आहे. या संमेलनास संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक डॉ. शिवाजीराव मोहिते, महाराष्ट्र साहित्य परिषदेच्या प्रमुख कार्यवाहक सुनिताराजे पवार, शिवछत्रपती पुरस्कार विजेते डॉ. अरुण दातार, आमदार महेश दादा लांडगे, आमदार बाबाजी काळे आदी प्रमुख पाहुणे उपस्थित राहणार आहेत.




यावेळी आमदार महेश लांडगे यांच्या हस्ते अक्षर इंद्रायणी या स्मरणिकेचे आणि काल भवताल या कथासंग्रहाचे श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात येणार आहे. तसेच इंद्रायणी साहित्य परिषदेचा यशवंतराव चव्हाण प्रज्ञावंत साहित्य पुरस्कार डॉ. श्रीपाल सबनीस यांना प्रदान करण्यात येणार आहे. आमदार बाबाजी काळे यांच्या हस्ते "स्वातंत्र्यसंग्रामातील समिधा" या क्रांतिकारकांच्या छायाचित्रांचे प्रदर्शनाचे उद्घाटन होणार आहे. सकाळी दहा वाजता "ज्ञानेश्वरी - काळाची गरज" या परिषदेचे उद्घाटन डॉ. आरती दातार यांच्या हस्ते करण्यात येणार आहे. या परिसंवादात संत साहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक हभप डॉ. नारायण महाराज जाधव, हभप ॲड. यशोधन महाराज साखरे, योगी निरंजनाथ गुरु शांतिनथ, ज्ञानेश्वरीचे ज्येष्ठ अभ्यासक रामदास जैद आदी सहभाग घेणार आहेत. या परिसंवादाचे सूत्रसंचालन प्रा. दिगंबर ढोकले तर समन्वयक म्हणून डॉ. सीमा काळभोर काम आहे. दुपारी दोन वाजता संमेलनाध्यक्ष दादाभाऊ जयवंत गावडे यांची ज्येष्ठ साहित्यिक राजेंद्र घावटे प्रकट मुलाखत घेणार आहेत. दुपारी तीन वाजता, डॉ. सदानंद मोरे यांची संदीप तापकीर प्रकट मुलाखत घेणार आहेत. सायंकाळी पाच वाजता "दुर्ग भटकंती" या अरुण बोराडे यांनी लिहीलेल्या पुस्तकाचे प्रकाशन निवृत्त आयपीएस अधिकारी डॉ. माधवराव सानप यांच्या हस्ते करण्यात येणार आहे.

यानंतर समारोप सत्रात ज्येष्ठ उद्योजक रामदास काकडे यांच्या हस्ते भूमिपुत्र पुरस्कार वितरण सोहळा संपन्न होणार आहे. यावेळी लोकसाहित्याचे ज्येष्ठ अभ्यासक प्रभाकर ओव्हाळ, महाराष्ट्र साहित्य परिषद पिंपरी चिंचवड अध्यक्ष राजन लाखे, सूत्रसंचालक श्रीकांत चौगुले आदी उपस्थित राहणार आहेत. सायंकाळी 7:30 वाजता, शिवांजली साहित्य परिषदेचे प्रवर्तक शिवाजीराव चाळक यांच्या अध्यक्षतेखाली निमंत्रितांचे कवी संमेलन होणार आहे. यामध्ये ज्येष्ठ साहित्यिक सुरेश कंक, संतोष घुले, समन्वयक डॉ. पौर्णिमा कोल्हे आदी उपस्थित राहणार आहेत अशी माहिती इंद्रायणी साहित्य परिषदेच्या वतीने प्रसिद्धीस देण्यात आली आहे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत हे बातमी पत्र मालक मुद्रक प्रकाशक संपादक शबनम रफीक सय्यद यांनी क्रांती मुद्रणालय, सर्वे नंबर १६/६८ विठ्ठल मंदिर जवळ,गुजर नगर,थेरगाव,पुणे- ३३ येथे छापून सर्वे नंबर ११/२,पडवळ नगर,थेरगाव,चिंचवड,पुणे -३३ येथून प्रकाशित केले आहे सदर बातमी पत्रातील मजकुरांशी संपादक सहमत असतीलच असे नाही (न्याय कक्षा पुणे न्यायालय)
अधिक माहितीसाठी : ८९९९९४८९६८ कार्यकारी संपादक :सय्यद रफिक हुसेन, • RNI - MAHMAR/2021/51259 • Email : metrocity924@gmail.com www.metrocityvrutant.in

# गेल्या वीस वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर



## सौ.मनीषा चंद्रकांत शिंदे

पिंपरी चिंचवड शहरात गेल्या वीस वर्षांपासून सामाजिक कार्यात अग्रेसर असणाऱ्या सौ मनीषा चंद्रकांत शिंदे या सध्या भारतीय जनता पक्षाच्या महिला मोर्चा मंडल सरचिटणीस ,शक्ती केंद्रप्रमुख, व बूथ प्रमुख पदावर अनेक वर्ष काम केले आहेत. तसेच अस्मिता महिला बचत गट चिंचवड च्या त्या अध्यक्ष आहेत तर सध्या पिंपरी चिंचवडच्या भाजपच्या जिल्हा कार्यकारिणीच्या सदस्य म्हणून त्या काम पाहत आहेत सामाजिक आणि राजकीय कार्य करत असताना पिंपरी चिंचवड शहरात सौ. मनीषा शिंदे यांचे नाव प्रामुख्याने घेतले जाते.सौ.मनीषा शिंदे यांनी 2017 मध्ये महानगरपालिका निवडणूक लढविण्याची इच्छा दर्शविली होती तशी त्यांनी तयारी केली होती परंतु त्यांना त्यावेळेस संधी मिळाली नाही, महानगरपालिका निवडणुकीत संधी मिळाली नसतानाही त्यांनी आपले सामाजिक कार्यपुढे सुरूच ठेवले, महिलांसाठी प्रौढ साक्षरता वर्गाचे आयोजन त्यांनी मोठ्या प्रमाणात केले. तसेच 2019 मध्ये कोल्हापूर मधील पूरग्रस्तांना त्यांनी मोठी मदत केली.

प्रधानमंत्री कौशल्य विकास योजने अंतर्गत त्यांच्या परिसरातील 500 महिलांना त्यांनी प्रशिक्षणासाठी जाण्याची सोय केली त्यांना शासकीय योजनेत सहभागी करून घेतले व प्रशिक्षण झाल्यानंतर त्यांना प्रमाणपत्र दिले. यामुळे अनेक महिलांना स्वतःचे रोजगार सुरु करता आले. तसेच कोरोनाच्या काळात अनेक रुग्णांना दवाखान्यात बेड मिळत नव्हते त्यावेळी त्यांना बेड उपलब्ध करून देऊन अनेक रुग्णांचे प्राण वाचविण्याचे कार्य मनीषा शिंदे यांच्या माध्यमातून झाले आहे. तसेच कोरोना काळात त्यांनी अनेक गरजूंना जीवन उपयोगी वस्तू तसेच अन्नधान्य पुरविण्याचे काम केले. आपले राजकीय कार्य करत असताना पदवीधर विकास व पदवीधर निवडणूकांसाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती आणि जनप्रसाराचे कार्य त्यांनी केले. तसेच रॉबिनहूड आर्मी या संस्थेसोबत कोरोना काळात मोफत लसीकरण शिबिरांचे आयोजन करून आपल्या कार्याची चूणुक सौ.मनीषा शिंदे यांनी दाखवून दिली. पिंपरी चिंचवड शहरातील खेळाडूंना प्रोत्साहन मिळेल यासाठी अनेक क्रीडा स्पर्धाचे आयोजन केले.

तसेच पर्यावरणाचे समतोल साधण्यासाठी संवर्धनासाठी वृक्ष लागवड व वृक्षारोपणाचे कार्यक्रम आयोजित केले. तसेच सौ. मनीषा शिंदे यांनी कलागुणांना वाव मिळावा याकरिता कलारंग सांस्कृतिक कला संस्था चिंचवड यांच्या माध्यमातून रामजन्मभूमी सोहळा व रामजीवन या विषयांवर मोठी चित्रकला स्पर्धा आयोजित केली. महायुती शासनाच्या वतीने सुरु करण्यात आलेल्या लाडकी बहीण योजनांमध्ये अनेक महिलांचे अर्ज भरून त्यांना लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळवून दिला. तसेच इयत्ता दहावी व बारावी मध्ये गुणवंत असणाऱ्या विद्यार्थ्यांना विविध बक्षीस देऊन त्यांना सन्मानित केले. तसेच महानगरपालिकेच्या माध्यमातून राबविल्या जाणाऱ्या अनेक योजनांचा लाभ नागरिकांपर्यंत पोहोचविला, विधवा महिलांना स्वयंरोजगार साठी अनुदान मिळवून दिले, असे अनेक सामाजिक कार्य सौ. मनीषा चंद्रकांत शिंदे यांच्यामार्फत होत आहेत, येणाऱ्या काळात पिंपरी चिंचवड शहरात शहराच्या विकासासाठी तसेच शहराच्या प्रत्येक घटकाचा आर्थिक ,सामाजिक व शैक्षणिक लाभ व्हावा या दृष्टिकोनातून मोठी सामाजिक संस्था उभी करण्याचे त्यांचे स्वप्न आहे. तसेच सामाजिक हित आणि लोकहित करिता आपले सामाजिक कार्य आपण निरंतरपणे सुरूच ठेवणार असल्याचे ते नेहमी सांगत असतात त्यांच्या या कार्याची अनेक सामाजिक संस्थांनी दखल घेतली असून त्यांना अनेक पुरस्कार व सन्मान देऊन गौरविण्यात आले आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना पिंपरी चिंचवड शहरातील मानाचा समजला जाणारा मेट्रो सिटी आयकॉन हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे.









# सामाजिक व राजकीय क्षेत्रात नावारुपास येत असलेलं युवा नेतृत्व

## प्रवीण दिलीप माळी



**सामाजिक कार्याची आवड, सामाजिक कार्य करता करता राजकारणात झालेला प्रवेश 26 वर्षीय तरुण शिक्षित इंजिनीयर असलेले प्रवीण दिलीप माळी यांचं नाव सामाजिक व राजकीय क्षेत्रात नावारूपास येत आहे.**

पिंपरी चिंचवड शहरात 2021 पासून महाराष्ट्र नवनिर्माण सेना च्या पक्षात चिंचवड विधानसभा उपविभाग अध्यक्ष म्हणून कार्यरत असलेल्या प्रवीण माळी यांनी 2020 मध्ये अभिनव रावेत सोशल फाउंडेशन ची स्थापना केली या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रवीण माळी अनेक सामाजिक उपक्रम राबविण्यात आले आहेत. महाराष्ट्र नवनिर्माण सेना पक्षाच्या वतीने दिलेली जबाबदारी सक्षमपणे सांभाळत आहेत तसेच आपल्या अभिनव रावेत सोशल फाउंडेशनच्या माध्यमातून सामाजिक कार्यही सुरु आहेत त्यांनी आतापर्यंत समाजातील अनेक घटकांना मदत व्हावी या दृष्टिकोनातून अनेक उपक्रम राबविली यामध्ये प्रामुख्याने विद्यार्थी आणि गरजू लोकांना मोफत अन्नदान ,परिसरात औषध फवारणी ,मेट्रो इको पार्क च्या उपोषणात सहभागी , कोविड काळात मोफत ॲंबूलन्स सेवा , दरवर्षी रक्तदान शाहीरांचे आयोजन ,पावसाळ्यात उद्भवणाऱ्या सामाजिक आपातकालिन समस्या सोडविण्यात अग्रेसर , प्रभागातील युवकांना क्रिडा क्षेत्रात विषेश प्राविण्य मिळावे या करीता विविध स्पर्धांचे आयोजन ,प्रभागातील ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचा विचार करून ....त्यांच्या साठी आनंदी ज्येष्ठाने कार्ड ... ज्यात ज्येष्ठ नागरिकांना सवलतीच्या दरात औषधोपचारांची सुविधा , महिला भगिनींच्या आरोग्याची विषेश काळजी - दरवर्षी महिलांसाठी मोफत आरोग्य तपासणी आणि मोफत वैद्यकिय सल्ला शिबीर , नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टिकोनातून प्रभागात सीसी टी व्ही कॅमेरांची उभारणी ,प्रभागात भव्य सायक्लोथॅान चे आयोजन , प्रभागातील नागरिकांच्या आरोग्याच्या दृष्टिकोनातून अनेक सोसायटींमध्ये डांस प्रतिबंधात्मक धूर फवारणी , नागरिकांच्या सोयी साठी शेतकरी आठवडे बाजाराने आयोजन रावेत शिंदेवस्ती परिसरात अनेक सामाजिक प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न ,ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत नेत्र चिकित्सा शिबीर ,रावेत परिसरात दरवर्षी स्वच्छता शिबीराचे आयोजन , आंबेडकर जयंती निमित्त मोफत शालेय साहित्याचे वाटप , शासन आपल्या दारी उपक्रमा अंतर्गत प्रभागातील नागरिकांना मोफत विविध दाखल्यांचे वाटप , कोविड काळात वीटभट्टी कामगारांना मोफत धान्याचे वाटप , परिसरातील नागरिकांसाठी योगा शिबीराचे आयोजन सांस्कृतिक उपक्रम म्हणून दरवर्षी भव्य दहिहंडी चे आयोजन.त्यांच्या याच सामाजिक कार्याची दखल घेतली त्यांना पिंपरी चिंचवड शहरातील मानाचा समजला जाणारा मेट्रोसिटी आयकॉन अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात येत आहे.











# अन्याय विरुद्ध लढा,महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून

## श्री.विजय गोविंद जरे

पिंपरी चिंचवड शहरात महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून विविध क्षेत्रात अन्याय विरुद्ध लढा देऊन न्याय कसा देता येईल यासाठी नेहमी प्रयत्नशील असणारे श्री विजय गोविंद जर यांचे सामाजिक व राजकीय कार्य सुरु आहेत. समाजाच्या विकासासाठी तसेच वंचित घटकांना न्याय देण्यासाठी त्यांनी अनेक जन आंदोलन मध्ये सहभाग घेतला. त्यांच्यामार्फत अनेक सामाजिक कार्य पिंपरी चिंचवड शहरात सुरु आहेत ,त्यांच्या कार्याची दखल घेत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने त्यांना पिंपरी चिंचवड शहराचं शहराध्यक्ष पद भूषविण्याचं भाग्य मिळालं त्यांनी आपल्याला मिळालेल्या संधीचे सोने करत महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या माध्यमातून अनेक सामाजिक व राजकीय कामे करून स्वतःचा एक ठसा समाजात उमटविला आहे. त्यांनी महानगरपालिकेच्या चुकीच्या कारभारावर अनेक आंदोलने केली, त्यामध्ये प्रामुख्याने चिखली मधील साने चौक ते चिखली या अरुंद रस्ते आणि वाहतूक विषयक प्रश्नांच्या विरोधात आंदोलन करून अनेकांचे लक्ष वेधून घेतले. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या अ क्षेत्रीय कार्यालया अंतर्गत असणाऱ्या अनेक प्रश्नांवर त्यांनी आवाज उठविला आहे. तसेच चिखली परिसरात वाढलेल्या गुन्हेगारीवर आळा घालण्यासाठी त्यांनी आपल्या पक्षाच्या माध्यमातून पोलीस आयुक्तालयाला निवेदने देऊन तो प्रश्न मार्गी लावण्याचा प्रयत्न केला आहे. प्रामुख्याने साने वस्ती येथील टाऊन हॉल ला दिवंगत नगरसेवक स्वर्गीय दत्ता काका साने यांचे नाव द्यावे अशी मागणी त्यांनी महानगरपालिकेकडे केली आहे.

त्यांच्या सामाजिक कार्याची दखल अनेक सामाजिक संस्थांनी घेतली असून त्यांच्या याच कार्याची दखल घेत त्यांना मेट्रो सिटी आयकॉन अवॉर्ड 2024 हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येत आहे









## संघर्षमय जीवन प्रवास

# शून्यातून संपूर्ण जग निर्माण करणारं व्यक्तिमत्व

## सौ.शैला निकम



संघर्षातून यश कडे वाटचाल, शून्यातून जग निर्माण करणे हे आपण नेहमी ऐकतो, वाचतो, परंतु क्वचितच आपल्याला शून्यातून जग निर्माण करणारे व्यक्तिमत्व भेटत असतात आपण त्यांच्याबद्दल वाचतो ,बोलतो त्यांच्या संघर्षमय जीवनाबद्दल प्रेरणादायी प्रवासाबद्दल जाणून घेतो असेच एक व्यक्तिमत्व आपल्या पिंपरी चिंचवड शहरात आहे त्यांचं नाव म्हणजे "सौ शैला सिद्धनाथ निकम" या पिंपरी चिंचवड शहरात श्री इंटरप्राईजेस नावाची हाउसकीपिंग एजन्सी चालवतात. त्यांनी यशस्वीपणे आपल्या या हाउसकीपिंग कंपनीची निर्मिती केली आहे. आज संपूर्ण पिंपरी चिंचवड शहरातील उद्योग नगरीत त्यांचं एजन्सीच काम मोठ्या प्रमाणात सुरु आहे. सौ शैला निकम या यशस्वी उद्योजिका म्हणून पिंपरी चिंचवड शहरात नावारुपाला आल्या आहेत परंतु यशस्वी उद्योजिका होण्यापूर्वी सौ. शैला निकम यांनी अत्यंत संघर्षमय जीवन प्रवास केला आहे.

अत्यंत हलाखीच्या परिस्थितीतून त्यांनी संघर्षमय वाटचाल करत आपल्या उद्योग क्षेत्रात तसेच कौटुंबिक जीवनात यश प्राप्त केले आहे. त्यांच्या या संघर्षमय जीवन प्रवासात त्यांच्या कुटुंबीयांकडूनही त्यांना मोलाची साथ मिळाली आहे त्यांचे पती श्री सिद्धनाथ निकम व त्यांच्या दोन मुली व मुलगा यांचा खूप मोठा मोलाचा वाटा आहे. त्यांची एक मुलगी सी.ए. असून त्यांची दुसरी मुलगी ही मेकअप आर्टिस्ट आहे तर त्यांचा मुलगा गणेश निकम हा त्यांच्या या व्यवसायात त्यांना मोलाची साथ देत आहे तसेच त्या आता राजकारणातही सक्रिय आहेत. शिवसेना पक्षाच्या त्या पिंपरी विधानसभा प्रमुख पदी कार्यरत आहेत यासाठी त्या शिवसेनेचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे व पुण्याचे जिल्हाप्रमुख बाळासाहेब वाल्हेकर तसेच महिला शहर प्रमुख सरिता साने यांच्या मार्गदर्शनात राजकीय वाटचाल करत असल्याचे सांगतात.सर्वांनाच प्रेरणादायी असं त्यांचं जीवन प्रवास राहिला आहे. त्या अनेकांना प्रेरणा देणारे प्रतिष्ठित व्यक्तिमत्व ठरल्या आहेत त्यांनी आपला जीवन प्रवास त्यांच्याच शब्दात मांडला आहे.

“अतिशय खडतर जीवनातून प्रगतीकडे वाटचाल करत असताना अनेक अडचणींना मला सामोरे जावे लागले सुरुवातीला मुले लहान होती आणि दहा बाय दहाची एक छोटीशी खोली, तिथून माझा प्रवास सुरु झाला. परिस्थिती अतिशय हालकीची. एक वेळचं जेवण मिळणं म्हणजे सुद्धा अवघड होतं अश्या परिस्थितीत बाहेर जाऊन काम अनिवार्य होतं सुरुवातीला मी ऍसिड वॉश चे काम चालू केले ते काम करत असताना माझा मुलगा त्यावेळी सोळा वर्षाचा होता तो सुद्धा मला मदत करायचा हे सगळं काम करत असताना बराच वेळ हाता पायाला भाजले सुद्धा परंतु परिस्थिती पुढे माणसाचं काही चालत नाही माझ्या तिन्ही मुलांनी या अशा अडचणींमध्ये खूप साथ दिली पण मागे वळून पाहिले नाही अशा मध्येच हाउसकीपिंग चे काम चालू करण्याचा प्रयत्न मी केला सुरुवातीला माझ्याकडे मी स्वतः व माझ्या हाताखाली एक महिला होती असे आम्ही दोघीच हाउसकीपिंग चे काम करत होतो हे काम करत असताना

खूप वेळा हाउसकीपिंग सारख्या कामाला कमी लेखले गेले व अपमान सुद्धा झाला पण माझ्या कामाची पद्धत पाहून लोकांना ते काम आवडत गेलं आणि हळूहळू प्रगती झाली आज माझ्याकडे हाउसकीपिंगच्या मशीन आहेत हाऊस कीपिंग साठी लागणारे संपूर्ण मटरेल आहे एक वेळ होती की मी दुसऱ्याकडे काम करत होते पण आज माझ्याकडे माझ्या हाताखाली महिला कामगार माझ्या श्री एंटरप्राइजेस नावाच्या कंपनीमध्ये काम करत आहेत माझ्यासारख्या अडचणी महिलांना येऊ नये म्हणून मी सतत प्रयत्न केले महिलांच्या हाताला काम देणे हेच माझं ध्येय आणि उद्देश आहे आणि आज मी यशस्वी आणि समाधानी आहे आणि या सर्व कामांमध्ये माझ्या दोन मुली आणि मुलगा यांचा खूप मोठा वाटा आहे.

परिस्थितीची जाणीव ठेवून माझ्या मुलींनी मला साथ दिली मोठी मुलगी सीए आहे तर दुसरी बी कॉम आहे व मेकअप आर्टिस्ट आहे माझा मुलगा श्री गणेश निकम आज माझ्या खांद्याला खांदा लावून माझा बिझनेस सांभाळतो आहे.तसेच निलेश खेडकर ,ओम साळवे यांचे मोठे सहकार्य मिळाले आज माझी श्री एंटरप्राइजेस नावाची हाउसकीपिंग एजन्सी आहे आणि मी शिवसेनेच्या पिंपरी विधानसभा प्रमुख पदी काम करत आहे यासाठी माझ्यावर विश्वास दाखवल्याबद्दल माननीय खासदार श्रीरंग आप्पा बारणे तसेच जिल्हाप्रमुख माननीय श्री बाळासाहेब वाल्हेकर शहर संघटिका माननीय सौ सरिता ताई साने यांचे मी खूप खूप आभार मानते की त्यांनी माझ्यावर ही जबाबदारी सोपवली आहे माझ्यावर विश्वास दाखवला यामागे माझे पती श्री सिद्धनाथ निकम यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले .श्री स्वामी समर्थांच्या आशीर्वाद व देव रूपाने भेटलेल्या माझ्या सहकाऱ्यांचे मी खूप खूप आभार मानते







## बंदोबस्तावरुन घरी जाताना पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



पिंपरी : वर्षाखेरीस बंदोबस्त करून पहाटे घरी जात असताना एका पोलीस उपनिरीक्षकाचा अपघाती मृत्यू झाल्याची घटना बुधवारी पहाटे महाळुंगे येथे घडली.जितेंद्र गिरनार असे मृत्यू झालेल्या पोलीस उपनिरीक्षकाचे नाव आहे. गिरनार हे महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात नेमणुकीस होते. वर्षाखेरीस ते दिवस-रात्र बंदोबस्तासाठी तैनात होते. बुधवारी पहाटे बंदोबस्त संपवून ते घरी जात होते. महिंद्रा कंपनी समोरुन ते मोटारीतून जात होते. समोर एक कंटेनर उजव्या लेन मधून चालला होता मात्र, कंटेनर चालकाने अचानकपणे कंटेनर डाव्या लेनमध्ये घुसला. गिरनार यांच्या मोटारीची कंटेनरला पाठीमागून जोरदार धडक बसली. या अपघातात गिरनार गंभीर जखमी झाले. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेने पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात हळहळ व्यक्त केली जाती आहे.गिरनार मागील काही वर्षांपासून पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालयात कार्यरत आहेत. पूर्वी ते वाकड पोलीस ठाण्यात नेमणुकीस होते. त्यानंतर मागील काही महिन्यांपूर्वी त्यांची महाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाण्यात बदली झाली होती.

## भरधाव वेगात आलेल्या वाहनाची एकाला धडक ; गुन्हा दाखल




दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

शिरगाव : शिरगाव मध्ये अनोळखी व्यक्तीने भरधाव वेगात येऊन एकाच्या वाहनाला जोरात धडक दिली. या अपघातात वाहनाचा मोठा नुकसान झाला आहे, याप्रकरणी किरण मच्छिंद्र टापरे (वय 43, रा.नवी सांगवी) यांनी अनोळखी व्यक्तीच्या विरोधात गुन्हा दाखल केला आहे. ही घटना 30 डिसेंबर 2024 रोजी चांदखेड येथे घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अनोळखी आरोपी याने चांदखेड रस्त्यावर जात असलेल्या किरण यांच्या गाडीला भरधाव वेगात येत जोरात धडक दिली .या अपघातात फिर्यादी गंभीर जखमी झाले. तसेच फिर्यादी यांच्या वाहनाला जोरात धडक दिल्याने त्यांच्या वाहनाचे देखील मोठे नुकसान झाले, याबाबत अधिक तपास शिरगाव पोलीस करीत आहेत.

## अवैधरीत्या तंबाखू,गुटखा विक्री करणाऱ्यास अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

काळेवाडी : वाकड मध्ये अवैधरित्या अमली पदार्थ यामध्ये तंबाखूजन्य, गुटखा पदार्थाचा माल विक्री केल्याप्रकरणी एकास अटक करण्यात आली आहे ही घटना 30 डिसेंबर 2024 रोजी काळेवाडी, कुणाल शॉप येथे घडली.

याप्रकरणी कालेवाडी पोलीस स्टेशनचे पोलीस शिपाई स्वप्निल लोखंडे यांनी फिर्याद दिली असून, विनोद प्रजापती (वय 32, रा.छत्रपती चौक, रहाटणी) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विनोद याने अवैधरित्या अमली पदार्थ त्यामध्ये तंबाखूजन्य, गुटखा या प्रकारे प्रतिबंधित असलेले तंबाखू बेकायदेशीरपणे विक्री केल्याने त्याच्या विरोधात गुन्हा दाखल करून विनोद याला अटक करण्यात आली आहे. याबाबत अधिक तपास काळेवाडी पोलीस करीत आहेत.

## भोसरीत खंडणी मागून दहशत निर्माण करणाऱ्या आरोपीस अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

भोसरी : "मी इथला भाई आहे, तुला माहीत नाही का? तुला जगायचा कंटाळा आला आहे का?" असे म्हणत आरोपीने दोन हजार रुपयाची खंडणी मागून दहशत निर्माण केल्याचा प्रकार समोर आला आहे. ही घटना 31 डिसेंबर 2024 रोजी सिमरन मोबाईल शॉप, बालाजी नगर टेल्को रोड, एमआयडीसी भोसरी येथे घडली.याप्रकरणी फिर्यादी महिला यांनी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार अशोक दुर्गा पवार (वय 19) यास अटक करण्यात आली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांचे सिमरन मोबाईल शॉपी नावाने झेरॉक्स शॉप चे दुकान आहे. या



दुकानावर येऊन आरोपी अशोक याने दोन हजार रुपयांची खडणी मागितली, खंडणी न दिल्याने त्याने शिवीगाळ व दमदाटी करत दहशत निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तसेच फिर्यादी यांना जिवे मारण्याची धमकी दिली. याप्रकरणी एमआयडीसी भोसरी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून आरोपीला अटक करण्यात आली आहे. याबाबतचा अधिक तपास एमआयडीसी भोसरी पोलीस करीत आहेत.

## पत्नीवर गोळी झाडण्याचा प्रयत्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

चाकण : तू घरी चल नाही तर येथेच तुला गोळी घालेन, असे म्हणत पतीने पत्नी आणि सासू-सासऱ्याला मारण्यासाठी गावठी पिस्तुलातून गोळी झाडत असताना पिस्तुलाचा ट्रिगर न दबल्याने पत्नीसह तिघांचे प्राण वाचले. ही घटना येथे रविवारी (दि. 29) दुपारी साडेचार वाजण्याच्या सुमारास निघोजे (ता. खेड) येथे घडली.हरीश अशोक काकडे (वय 24, रा. शिवाजीवाडी, मोशी) असे गुन्हा दाखल झालेल्या पतीचे नाव आहे. याबाबत त्याच्या 21 वर्षीय पत्नीने सोमवारी (दि. 30) महाळुंगे एमआयडीसी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी महिलेने आपल्यासोबत मोशी येथे सासरी यावे यासाठी आरोपी निघोजे येथे आला होता. त्याचे पत्नीशी भांडण झाल्यावर तिच्या हातातील मोबाइल त्याने खेचून घेतला. तू घरी चल नाहीतर येथेच तुला गोळी घालेन, अशी धमकी त्याने पत्नीला दिली.

## दारू विक्री करणाऱ्यास अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



म्हाळुंगे येथे बेकायदेशीरपणे दारू विक्री करणाऱ्या एकास अटक करण्यात आली आहे. ही घटना 30 डिसेंबर 2024 रोजी तळवडे ब्रिज, महाळुंगे येथे घडली.

या प्रकरणी एमआयडीसी पोलीस स्टेशनचे हवालदार मंगेश कदम यांनी फिर्याद दिली असून, सोमनाथ थोटे (वय 24, रा. गणेश नगर ,चिखली) तसेच बाळू पवार (रा.मोशी) याच्या विरोधात गुन्हा दाखल करून सोमनाथ याला अटक करण्यात आली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमनाथ आणि बाळू याने बेकायदेशीर रित्या 1260 रु.लिटर हातभट्टी दारू एकूण विक्री करण्यासाठी नेत होते, याची माहिती पोलिसांना मिळाली असताना, त्यांच्याकडून एकूण 1 लाख 26 हजार रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली आहे, याबाबत अधिक तपास म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस करीत आहेत.

## भाजीपाल्याचा स्टॉल लावण्यासाठी खंडणी मागून वाहनांची तोडफोड

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी : भाजीपाला विक्रीचा स्टॉल लावण्यासाठी खंडणीची मागणी करत तिघांनी वाहनांची तोडफोड करून दहशत निर्माण केली.

ही घटना सोमवारी (दि. 30) रात्री आठ वाजता मोशीतील आदर्शनगर येथे आठवडे बाजारात घडली. पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या खंडणी विरोधी पथकाने तिघा संशियतांना कात्रज येथील एका लॉजमधून जेरबंद केले.अनिकेत भरत उतळे (19, रा. आदर्शनगर, मोशी) याला पोलिसांनी अटक केली असून दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे. शेषेराव सोनेराव फड (50, रा. मोशी) यांनी एमआयडीसी भोसरी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली. फिर्यादी फड हे भाजी विक्रीचा व्यवसाय करतात.

त्यांना भाजी विक्रीचा स्टॉल लावण्यासाठी संशयितांनी खंडणीची मागणी केली.

फड यांनी संशयितांना खंडणी दिली नाही, त्या कारणावरून संशयितांनी फड यांच्या वाहनाची आणि इतर वाहनांची दगड व कोयत्याने तोडफोड



करून नुकसान केले. या गुन्ह्याचाखंडणी विरोधी व औद्योगिक तक्रारी निवारण पथकामार्फत समांतर तपास सुरु होता.

संशयित कात्रज येथील अश्विनी लॉजमध्ये असल्याची माहिती मिळाली. छापा टाकून तिघा संशयितांना जेरबंद केले.पोलिस आयुक्त विनय कुमार चौबे, सह आयुक्त डॉ. शशिकांत महावरकर, अपर आयुक्त वसंत परदेशी, उपायुक्त संदीप डोईफोडे,शिवाजी पवार, सहायक आयुक्त बाळासाहेब कोपनर यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलिस निरीक्षक देवेंद्र चव्हाण, वरिष्ठ पोलिस निरीक्षक गणेश जामदार, पोलिस उपनिरीक्षक सुनील भदाणे, पोलिस अंमलदार आशिष बोटके, प्रदीप गोडांबे, मंगेश जाधव, नितीन खेसे, चंद्रकांत गवारी यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# युवा नेतृत्व खंबीर कर्तृत्व

## सौ.किर्ती माऊती जाधव



पिंपरी चिंचवड शहरातील घरकुल परिसरातील सामाजिक कार्यकर्त्या सौ कीर्ती मारुती जाधव या अनेक सामाजिक कार्यात अग्रेसर असलेलं व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी आतापर्यंत आपल्या सामाजिक कार्याने आपला नावलौकिक उंचावलेला आहे. समाजातील अनेक वंचित घटकांना न्याय देण्याचे कार्य त्यांच्या माध्यमातून होत आहेत.

सौ कीर्ती जाधव यांनी आपल्या परिसरातील नागरिकांसाठी अनेक सोई सुविधा मोफत उपलब्ध करून दिले आहेत. यामध्ये आयुष्यमान भारत योजना, ही श्रम कार्ड, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र ,अपंग प्रमाणपत्र, स्मार्ट आधार कार्ड ,स्मार्ट पॅन कार्ड तसेच विविध शासकीय योजनांचा लाभ अनेक कुटुंबांना मिळून दिला आहे. युवकांना रोजगार मिळावा या हेतूने त्यांनी भव्य नोकरी महोत्सावेचेही आयोजन करून अनेक तरुणांना तसेच तरुणींना रोजगार मिळवून दिला आहे. कोरोना काळातील त्यांचे मदत कार्य अजूनही अनेकांच्या आठवणीत आहेत. आपल्या परिसरातील महिलांच्या कलागुणांना वाव देण्याचे कार्य त्यांनी मोठ्या प्रमाणात केले आहे. एक हात मदतीचा या टॅगलाईन शीर्षकांतर्गत अनेक घटकांना मदत करण्याचे अभियान त्यांचे निरंतरपणे सुरु आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या चुकीच्या कारभाराच्या विरोधात त्यांनी अनेक आंदोलने केली अनेक निवेदने दिली त्यांच्या अनेक निवेदनाने आंदोलनाला यश मिळाले आहे. यामध्ये प्रामुख्याने सांगायचे झाल्यास रुग्णवाहिका दरवाढी विरोधात त्यांनी महापालिकेला पाठपुरावा करून दरवाढ थांबवली त्यामुळे अनेक रुग्णांना त्याचा फायदा झाला.

भोसरी विधानसभा मतदारसंघाचे आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे सामाजिक व राजकीय कार्य सुरु आहे.

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांनी 2500 गोमातांना चारा उपलब्ध करून दिला ,तसेच वाय सी एम सारख्या मोठ्या रुग्णालयात रुग्णांना फळे वाटप ही केली.

महिलांसाठी आरोग्य शिबीरे, हळदीकुंकवाचा कार्यक्रम तसेच विविध महिलांसाठीच्या स्पर्धा त्या नेहमी आयोजित करत असतात. घरकुल मधील सर्वात मोठ्या बहुउद्देशीय सभागृहाला साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांचे नाव देण्याची मागणी त्यांनी केली. तसेच मातंग समाजाचा कौटुंबिक स्नेह मेळावा आयोजित करून त्यांनी मातंग समाजाला एकत्रित आणण्याचे कार्य केले आहे या निमित्ताने मातंग समाजातील अनेक मान्यवरांचा सन्मान सोहळा त्यांनी आयोजित केला आहे, मातंग समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचाही त्यांनी सन्मानाने सत्कार केला आहे. त्यांच्या या सामाजिक कार्याची दखल अनेक सामाजिक संस्थांनी घेतली असून त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.












# किरकोळ कारणावरुन मेहुण्याला मारहाण

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

किरकोळ कारणावरून दोन मेहुण्यांना मारहाण करून जखमी केले. याप्रकरणी जखमी तरुणाच्या बहिणीच्या पती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही घटना सोमवारी (दि. 30) सायंकाळी चिंबळी येथे घडली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपी दामोदर हा फिर्यादी अशोक यांच्या बहिणीचा पती आहे. त्याने किरकोळ कारणावरून अशोक आणि त्यांचा चुलत भाऊ मोहन यांना शिवीगाळ केली. अशोक यांच्या हाताला चावा घेऊन तसेच दगडाने मारून जखमी केले. तर मोहन यांना दगडाने मारून जखमी केले. आळंदी पोलीस तपास करीत आहेत.

# तळेगाव परिसरातून तीन बांगलादेशी अटक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

तळेगाव एमआयडीसी परिसरातून तीन बांगलादेशी नागरिकांना भारतात अवैधरित्या वास्तव्य केल्या प्रकरणी अटक करण्यात आली आहे. ही कारवाई पिंपरी-चिंचवड दहशतवाद विरोधी कक्षाने सोमवारी (30 डिसेंबर) केली. हे बांगलादेशी नवलाख उंब्रे येथील एका कंपनीमध्ये मजुरीचे काम करत होते. ते मागील पाच वर्षांपासून भारतात बेकायदेशीरपणे वास्तव्य करत होते.हुसेन शेख (31), मोनिरुल गाझी (26), अमीरुल साना (34, सातखिरा, बांगलादेश) अशी अटक केलेल्या बांगलादेशी नागरिकांची नावे आहेत. त्यांच्यासह त्यांना बनावट कागदपत्रे बनवून देणाऱ्या अनोळखी व्यक्ती विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.आरोपी हे बांगलादेशी नागरिक आहेत. ते कामाच्या निमित्ताने भारतात आले होते. हुसेन शेख याचे घर भारत-बांगलादेश सीमेवर आहे. त्याचे काही नातेवाईक भारतातील पश्चिम बंगाल मध्ये देखील आहेत. त्यामुळे त्याचे नातेवाईकांकडे वारंवार येणेजाणे होत असे. सन 2019 मध्ये हुसेन शेख हा त्याचे मित्र मोनिरुल व अमीरुल यांना घेऊन भारतात आला. तिघेही कामाच्या निमित्ताने तळेगाव एमआयडीसी येथे आले. तिथेच एका कंपनीत काम करु लागले.आरोपी हुसेन, मोनिरुल आणि अमीरुल यांनी तळेगाव येथे एका एजंट मार्फत बनावट कागदपत्रे तयार केली आहेत. आरोपींचे बनावट आधारकार्ड आणि पॅनकार्ड पोलिसांनी जप्त केले आहे. ज्या एजंट कडून त्यांनी कागदपत्रे काढून घेतली त्याच्याबाबत त्यांना देखील माहिती नाही. त्यामुळे अनोळखी एजंट विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला भारत-बांगलादेश सीमेवर काही ठिकाणी सुरक्षा व्यवस्था चोख नाही. त्यामुळे शेतातून, बसमधून बांगलादेशी नागरिक पश्चिम बंगाल मध्ये येतात. हुसेन शेख आणि त्याचे दोन्ही साथीदार बसने पश्चिम बंगाल येथे आले. तिथून रेल्वेने ते पुणे येथे आले. त्यानंतर त्यांनी तळेगाव एमआयडीसी मधील कंपनीत काम शोधून तिथे वास्तव्य सुरु केले.पिंपरी-चिंचवड दहशतवाद विरोधी कक्षाने तीन बांगलादेशींना अटक केली. त्यांना पुढील चौकशीसाठी तळेगाव एमआयडीसी पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. पोलिसांनी तिघांना न्यायालयात हजर केले. न्यायालयाने तिघांना तीन दिवस पोलीस कोठडी सुनावली आहे. तळेगाव एमआयडीसी पोलीस तपास करीत आहेत.




